MHBU170003292026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९/२०२६ मधील**
**निशाणी क्र. १ वरील आदेश**
**(दिनांक - १०/०७/२०२६)**

**१.** अर्जदाराने प्रस्तुत अर्ज मुंबई विनिमयन (Regulation) अधिनियम १८२७ चे कलम ०२ नुसार वारसाप्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

**२.** अर्जदार नं. १ पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील नामे प्रकाश रमाकांत ठाकरे  हे दिनांक २०/०७/२००३ रोजी मृत्यू पावले असुन त्याचे पश्चात त्याचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं. १ व २ हेच कायदेशीर वारस असुन सदर मयत नामे प्रकाश रमाकांत ठाकरे  यांना अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

**३.** मयत प्रकाश रमाकांत ठाकरे  हयाचे कायदेशीर वारस म्हणून शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी त्याचे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. म्हणून वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल करुन वारसा प्रमाणपत्र यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रस्तुत प्रकरणी निशाणी क्र. ०९ वरील आदेशान्वये दैनिक ''पुण्यनगरी'' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २०/०४/२०२६ रोजी अर्जदारांच्या मागणीसंबंधी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या व नोटीस बोर्डावर नोटीस बजावल्याच्या तारखेपासून निर्धारित वेळेमध्ये कोणीही कसलाही आक्षेप नोंदविलेला नाही.

**५.** अर्जदारांनी त्यांच्या अर्जाच्या सिध्दतेसाठी खालीलप्रमाणे तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

१. साक्षीदार क्र. १ किरण प्रकाश ठाकरे  (अर्जदार क्र.१) हिचे सरतपासणीचे शपथपत्र निशाणी क्र. १०.

३. मयताचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. ११.

४. दैनिक ''पुण्यनगरी'' मधील जाहिर प्रगटन निशाणी क्र. ०९

५ अर्जदार क्र. २ यांचे शाळा सोडण्याचा दाखला छायांकीत प्रत.

६. अर्जदार क्र. १ व २ च्या पडताळलेल्या आधार कार्डच्या छायांकीत प्रती.

त्यानंतर, अर्जदारांनी निशाणी क्र. १२ वर साक्षीपुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली आहे.

**६.** अर्जदारांतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. एस. बी. मुंढे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**७.** सा.क्र.१ यांच्या पुराव्याचे शपथपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्यामध्ये सदर साक्षीदाराने अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. सा.क्र.१ व २ च्या तोंडी पुराव्याचे व अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मयत प्रकाश रमाकांत ठाकरे हे दिनांक २०/०७/२००३ रोजी मौजे सुलतानपुर, ता. लोणार, जि. बुलडाणा येथे मयत झाल्याचे स्पष्ट होते. वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या, ग्रामपंचायत कार्यालय, लोणार, दिवाणी न्यायालय, लोणारच्या नोटीस बोर्डावर, नोटीस बजावल्याच्या तारखेपासून निर्धारित वेळेमध्ये कोणीही कसलाही आक्षेप नोंदविलेला नाही. अशा परिस्थतीत, अर्जदाराचा पुरावा विनाआव्हानित राहिल.

८. सबब अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हे मयताचे कायदेशिर वारस आहेत. म्हणून वारसा प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देणे योग्य व न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार (१) किरण प्रकाश ठाकरे , (२) उमेश प्रकाश ठाकरे, हे मयत प्रकाश रमाकांत ठाकरे , यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र देण्यात येते.

३. अर्जदारांनी नियमाप्रमाणे आवश्यक तो न्यायालयीन शुल्क भरणा करावा. सदर आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. स्वा/ -

दिनांक. ०१/०७/२०२६. (आर.बी.हनवते)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,लोणार.